# भोर उपजिल्हा रुग्णालय ‘मदत कक्ष व संपर्क सेतू’

# प्रश्न तुमचे, उत्तर ‘मदत कक्षा’चे


*आपल्या रुग्णालयात चालवले जाणारे ‘मदत कक्ष’ आपल्या मदतीसाठी तत्पर!!*

आपल्या जवळच्या सरकारी दवाखान्यातील सेवा-सुविधा कोणत्या?

सरकारी दवाखान्यात कोणत्या तपासण्या केल्या जातात?

आजारी पेशंटसाठी नेमके काय करायचे? कुठे जायचे?

‘जननी सुरक्षा योजना’ आणि ‘प्रधानमंत्री मातृ वंदना योजने’चा लाभ कोणाला व कसा मिळतो?



कोरोना पेशंटला अ‍ॅडमिट करायचे आहे. त्यांना ऑक्सिजनची सोय उपलब्ध होत नाही. कुणाची मदत घ्यायची?

खासगी दवाखान्यात महागडे उपचार परवडत नाही. कोरोनावर मोफत उपचार कुठे होतात?

कोरोनाच्या आजारावर तसेच इतर गंभीर आजारावर आम्हाला मोफत उपचार मिळतील अशा शासकीय योजना कोणत्या आहेत? त्यामध्ये आम्हाला उपचार मिळू शकतील का?

‘महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना’ व ‘पंतप्रधान जन आरोग्य योजने’त कुणाला व कोणते उपचार मिळतात? या योजने अंतर्गत आपल्या तालुक्यात कुठे कुठे उपचार मिळतात? या योजनेचा लाभ कसा घ्यायचा?

**वरील सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्या रुग्णालयाच्या मदत कक्षातून हमखास मिळणार!!**

---

**हेल्प लाईनवर फोन करा आणि करा आपल्या शंकांचं समाधान**



# मदत कक्ष व संपर्क सेतू

## (भोर उपजिल्हा रुग्णालय (SDH), जि. पुणे)

# 7776002025

**(सोमवार ते शनिवार ओ.पी.डी.च्या वेळेत)**

---

*आपल्या रुग्णालयात उपचारासाठी गेल्या गेल्या सर्वात पहिले मदत कक्षाला भेट द्या! आणि आरोग्य योजनांची माहिती जाणून घ्या!*

*जास्तीत जास्त लोकांनी या मदत कक्षाचा लाभ घ्यावा म्हणून हा संदेश आणि हेल्प लाईन नंबर इतरांनाही पाठवा!*

# योजनांविषयी माहिती

## प्रधान मंत्री मातृत्व वंदना योजना (PMMVY)

**मुख्य उद्देश-**

- काम करणाऱ्या महिलांच्या मजुरीची नुकसान भरपाई आणि योग्य पोषण आणि आराम मिळावा.
- गरोदर महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या आरोग्यामध्ये सुधारणा व्हावी आणि कुपोषणाचा प्रभाव कमी व्हावा.

**पात्रता-** गरोदर आणि स्तनपान करणाऱ्या पहिल्या जीवित अपत्याला जन्म दिलेल्या महिलेस.

**योजनेचा लाभ -**

- **पहिला टप्पा-** १००० रुपये गरोदरपणाची नोंदणी झाल्यावर.
- **दुसरा टप्पा-** २००० रुपये सहाव्या महिन्यानंतर प्रसुतीपूर्व तपासणी केल्यास.
- **तिसरा टप्पा-** २००० रुपये बाळाच्या जन्मानंतर नोंदणी आणि बीसीजी, ओपीव्ही, डीपीटी आणि हिपेटायटीस बी या लसीकरणाचे पहिले चक्र सुरू झाल्यावर.

(या योजनेतील रक्कम महिलेच्या बँक खात्यावर (DBT- Direct Benefit Transfer) जमा करण्यात येईल.)

**पुढील परिस्थितीमध्ये या योजनेचा लाभ घेता येणार नाही-**

- केंद्रीय किंवा राज्य सरकारअंतर्गत नोकरीसाठी असलेल्या व्यक्ती.
- याशिवाय इतर योजनाचा (अशाचप्रकारे) लाभ घेत असल्यास.

**आवश्यक कागदपत्रे-**

- बँक खाते झेरॉक्स प्रत
- प्रसूती कार्ड
- रहिवासी दाखला
- लसीकरण कार्ड
- गरोदर नोंदणी कार्ड
- आधार कार्ड

## जननी सुरक्षा योजना

**पात्रता-**

- दारिद्र्य रेषेखालील सर्व गर्भवती महिला.
- अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील सर्व गर्भवती महिला.
- प्रसूतीच्या वेळेस महिलेचे वय १९ वर्ष पूर्ण असावे.
- २ अपत्यापर्यंत लाभ देण्यात येईल.

**योजनेचा लाभ-**

हॉस्पिटलमध्ये प्रसूती झाल्यास रु. ६००/- लाभ.
सिझेरियन झाल्यास रु. १५००/- लाभ.

**आवश्यक कागदपत्रे-**

- बँक खाते झेरॉक्स
- आधार कार्ड झेरॉक्स
- लाभार्थी महिलेचा जन्म दाखल्याचा पुरावा
- दवाखान्याचे प्रसूती कार्ड
- रहिवासी दाखला

## महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य व प्रधान मंत्री जन आरोग्य योजना

(आयुषमान भारत अंतर्गत-प्रधान मंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या दोन्ही एकत्रितपणे राबविण्यात येत आहे.)

| प्रधान मंत्री जन आरोग्य योजना पात्रता | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना पात्रता |
|---|---|
| १. भारतीय नागरिक असणे अनिवार्य.<br>२. प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेच्या कक्षेत येणारे सर्व कुटुंब.<br>३. शासनाच्या www.pmjay.gov.in या संकेत स्थळावर नमूद केल्यानुसार रजिस्टर नागरिक. | वैध रेशन कार्ड (पिवळी, अंत्योदय, अन्नपूर्णा व केशरी, अवर्षण ग्रस्त जिल्ह्यातील शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी) तसेच फोटो ओळखपत्र किंवा तहसीलदार प्रमाणपत्र किवा अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>अधिक तपशीलासाठी - www.jeevandayee.gov.in या संकेतस्थळाचा वापर करावा. |

- महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रति कुटुंब प्रति वर्ष १.५० लक्षपर्यंत विमा संरक्षण मिळते. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ही मर्यादा २.५० लक्ष आहे.
- प्रधान मंत्री जन आरोग्य योजना योजनेंतर्गत प्रति कुटुंब प्रति वर्ष ५ लक्ष पर्यंत विमा संरक्षण मिळते. लाभार्थी कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीला किवा अनेक व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल.

**उपचार-** कोविड १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर सद्यःस्थितीत राज्यातील सर्व नागरिकांना १९.२३ मे २०२० रोजीचा शासन निर्णयाद्वारे महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेचा लाभ देण्यात येत आहे. कोविड १९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक शासकीय रुग्णालये कोविड रुग्णालये म्हणून घोषित केल्यामुळे शासकीय रुग्णालयांसाठी आरक्षित १३४ उपचारांपैकी १२० उपचार खाजगी अंगीकृत रुग्णालयांना खुले करण्यात आले आहेत. बरीचशी शासकीय रुग्णालये कोव्हिड उपचारासाठी आरक्षित केल्याने नॉन कोव्हिड ६७ रोग निदान चाचण्या, minor-major procedures चा लाभ नागरिकांना खाजगी अंगीकृत रुग्णालयांकडून देण्यात येत आहे.

**टीप-** सदर लाभ ३१ ऑक्टोबर २०२० पर्यंत असून सदर कालावधी वाढविण्याबाबत पुढील निर्णय परिस्थितीचा आढावा घेऊन शासनामार्फत घेण्यात येईल. कोव्हिड रुग्णासाठी २० श्वसन संस्थेचे व ICU उपचार उपलब्ध असून रुग्णास सहज उपचार मिळावेत म्हणून १० उपचारांना काही बाबतीत शिथिलता देण्यात आली आहे.

Society Regd. No. Maharashtra 4832/89
Public Trust Regd. No. F/6925

**रचना संस्था,**
**भोर उपजिल्हा रुग्णालय**
**जि. पुणे.**

साथी

**प्रकाशक- साथी-** फ्लॅट नं. ३ व ४, अमन ई टेरेस सोसायटी, डहाणुकर कॉलनी, कोथरूड, पुणे -३८.
**फोन-** ०२०-५४७२३२५/ २५४७३५६५

**ई-मेल-** sathicehat@gmail.com,
**वेबसाईट-** www.sathicehat.org
**मुद्रण-** संस्कृती डिझायनर्स
**सप्टेंबर २०२०**